काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

# Vinayaki Gudde

Where Sarcasm Finds Its Voice



Edition
04

May | 2024

Voice Vista
VENTURE BY POOJA PRASUN

Voice Vista

VENTURE BY POOJA PRASUN

# Vinayaki Gudde

Where Sarcasm Finds Its Voice

Ideation & Conceptualisation : Pooja Prasun
Original Content | Edited by : Vinayak Ranade
Production : Team Voice Vista
Proof Reading : Team Voice Vista
Designer : Creators Den

Disclaimer:

The views and opinions expressed in the interviews featured in this magazine belong solely to the individuals interviewed and do not necessarily reflect the official policy or position of the magazine, its editors, or its staff. The magazine strives to present a diverse range of perspectives and experiences, but inclusion of an interview does not constitute an endorsement of any views expressed therein.
Furthermore, the information provided in the interviews is for general informational purposes only. While we make every effort to ensure the accuracy and reliability of the content, we cannot guarantee the completeness or timeliness of the information. Readers are encouraged to conduct their own research and consult relevant professionals for specific advice or information.
The magazine and its contributors shall not be held liable for any loss, damage, or inconvenience arising from the use of or reliance on the information presented in the interviews. Any reliance you place on such information is strictly at your own risk.
We reserve the right to edit, modify, or remove any content deemed inappropriate, offensive, or misleading. Your feedback is valuable to us, so please feel free to contact us with any concerns or questions regarding the content featured in this magazine.
Thank you for your understanding and continued support.

Sincerely,
Vinayaki Gudde Editorial Team

# Vinayaki Gudde

Where Sarcasm Finds Its Voice



Dear Readers,

As the founder and owner of Voice Vista magazine, I am thrilled to introduce our latest addition to the family: Vinayaki Gudhe, where sarcasm finds its voice.

After the overwhelming success and support garnered by our previous publications - Femme Forward, Pedal Passion, and Kankavali Magazine - it became evident that it was time to bring something new and innovative to our readers. With Vinayaki Gudde, we aim to provide a platform for sharp wit and biting humor through the clever lines penned by the talented Vinayak Ranade.

In today's world, punchlines and sarcastic quotes have become a trend, resonating with readers who appreciate wit and irony. Through Vinayak Kaka's crisp and clever bunches of quotes on various aspects of life, we hope to bring a refreshing perspective to our readers' lives.

Vinayak Ranade, my Vinu Kaka, is renowned for his wit and initiatives like Granth Tumchya Dari, My Book Basket, Swarhotra etc, making him the perfect fit for our magazine. His photographs accompanying the punches add an extra layer of relatability and humor to his words.

So, let's hear it from Vinu Kaka himself as he takes us on a journey through his witty observations and insightful humor. We hope you enjoy this addition to our magazine and find yourselves laughing along with Vinayaki Gudde.

Warm regards,

Pooja Prasun

Founder & Owner, Voice Vista Magazine

Voice Vista
VENTURE BY POOJA PRASUN

# Vinayaki Gudde

Where Sarcasm Finds Its Voice





*विनायकी गुद्दे*

ग्रंथ तुमच्या दारी योजनेच्या प्रसारासाठी गेल्या 14 वर्षांत खूप बागडणे सुरू आहे, या व्यतिरिक्त निसर्गरम्य ठिकाणी भटकंती हा पण आवडीचा छंद, ज्या काळापासून मोबाईल मध्ये कॅमेरा आला तेंव्हापासून फोटो काढण्याचा नाद जडला, नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत गेले आणि फोटोची गुणवत्ता वाढतच गेली, त्याच्या जोडीला मोबाईलची मेमरी पण वाढत गेली.

माझं स्वतःवर जास्त प्रेम असल्यामुळे स्वतःचेच बदाबदा फोटो मी काढून घेतो, त्यात अंगात माकडचाळे चिक्कार, त्यामुळे माझे कपडे जसे चित्रविचित्र तसेच फोटो पण चित्रविचित्र असतात, अवखळपणा अंगात ठासून भरला आहे.

कशाचा फोटो काढायचा आहे हे जितके महत्त्वाचे, तितकेच फोटोत काय  टाळायला हवे हे जास्त महत्वाचे. हे चांगला फोटो काढण्याचं एक साधं तंत्र असते.

मी कायम आनंदी असतो कारण मी 52 पत्यातील कोणताही एक्का, राजा, गुलाम . . यांच्या प्रमाणे मूल्य चिकटवून घेत नाही, तसेच बदाम, इस्पिक . . . असं कोणत्याही रंगाचा किंवा पक्षाचाही न होता स्वतः जोकर होऊन वावरतो, त्यामुळे दोन एक्क्यांसोबत असलो की एक्का होतो, एक्का आणि राणी बरोबर आलो की राजा होतो, कोणत्याही रंगात मी त्यांचाच होऊन जातो, थोडक्यात 52 पत्यांपैकी कोणीही नसेल तर त्याच्या जागेवर मी चपखल बसतो, हेच तत्व जगतांना पण अंगीकारत असल्याने कायमच समाधानी असतो.

माझे स्नेही अर्थात थोरले बंधू तसेच आदरस्थानी असल्याने काका म्हणजे संजय कंक हे उत्तम लेखक आणि कवी आहेत, साधारपणे सन 2019 च्या सुमारास संजय कंक यांना फोटोला अनुसरून चार ओळी लिहिण्याचा छंद लागला. हळूहळू असंख्य कविता, लेख अशी त्यांची साहित्य क्षेत्रातील यशस्वी घोडदौड सुरू झाली. त्यांच्या लेखनाचा मी आद्य वाचक. कंकावली या नावाच्या सदराखाली त्यांचे अविरत दर्जेदार लेखन सुरू आहेच.
संजय कंक यांच्याकडून प्रेरणा घेऊन सन 2022 च्या आसपास मीपण माझ्याच चित्रविचित्र फोटोवर चित्रविचित्र शब्द खरडण्यास सुरवात केली. सुदैवाने व्हाट्सअप, फेसबुक ही सामाजिक प्रसार माध्यमं उपलब्ध असल्याने अशा शब्द बंबाळ छब्या मी पोस्टत राहिलो.

फोटोला अनुसरून जीवनमूल्ये, तत्वज्ञान, सामाजिक भान या अनुषंगाने असलेल्या माझ्या मतांना रानडे आडनावाला साजेश्या खोचक शब्दांच्या दगड गोव्यांना छबी बरोबर पोस्टत राहिलो.

अनेकांनी सुरवातीला न वाचताच अंगठे, फुले अशा इमोजीजचा भडिमार करून मला अजून बावळटपणा करायला बळ दिले,
जसं आपल्या घरातील बाळाच्या बोबड्या बोलाचं आप्तेष्टांना कौतुक वाटतं तसंच पुढे पुढे तर चक्क वाचून मला हरभऱ्याच्या झाडावर पण अनेकांनी चढवून हा बावळटपणा बहरण्यासाठी खतपाणी देत राहिले.

सर्वात कळस म्हणजे माझी लेक पूजा प्रसून हिने तर तिच्या व्हॉइस व्हीस्टा या कंपनीच्या माध्यमातून विनायकी गुद्दे या नावाने या सर्व शब्द पसाऱ्याला पुस्तक रूपाने आणण्याचा विडा उचलला. मी तिच्या बालहट्टाला दुजोरा देऊन माझा गाढवपणा परत एकदा सिद्ध केला.

आता वाचा आणि उपभोगा आनंद.


आणि नाही रुचलं तर भोगा माझ्यावरील प्रेमाची फळं.

विनायक रानडे
ग्रंथ तुमच्या दारी

आता करूया शब्दचित्रं वारी...

Voice Vista
VENTURE BY POOJA PRASUN

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



**देणाऱ्याचे आणि घेणाऱ्याचे मन तृप्त आणि आनंदी असलं की आपट्याच्या पानाचं सुद्धा *सोनं* होतं ,**

**नाती वृद्धिंगत करायला**
**निसर्गातील एक छोटेसे पानही पुरेसे असते ,**

**त्या एका पानामुळे संपूर्ण आयुष्याच्या पुस्तकाला *सोनेरी झळाळी* प्राप्त होते 🙏**

***थांबा , थांबा* !**
**हे वाचून लगेच आज *दसरा* कुठे आहे ?**
**असा डोक्याला शॉट लावून घेऊ नका ,**

**पाऊस दाटून आला आहे ,**
**मस्त गरमागरम चहा घेत मोबाईलच्या फोटो गॅलरीत फेरफटका मारताना हा फोटो दिसला , लगेच पोस्टला ,**
**बाकी काही नाही 😝**

**एव्हढं तत्वज्ञान मला कसं उमजेल , बरोबर ना ?**

**मग , जाऊ द्या ,**
**वाफाळलेला गरम चहा घ्या**

**आणि**

***Just Chilllll . . .***
😝😝😝😝😝



## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



***प्रत्येकाला आनंद स्वतःलाच शोधावा लागतो , तो कोणी तुम्हाला आणून देऊ शकत नाही***

**पावसाळा सुरू झाला की संपूर्ण सृष्टी बहरून येते , पण काही जणांना मात्र जागोजागी होणारा चिखल , तुंबलेले गढूळ पाणी , रस्त्यावर भरधाव जाणाऱ्या गाड्यांच्यामुळे अस्ताव्यस्त उडणारे पाणी याचीच काळजी पडलेली असते**

**अर्थात**

***ज्यांचे मन टवटवीत असेल तर त्यांची छत्रीही रंगून जाते***

**हे असं काहीच माझ्या मनात नव्हतं , पावसाळा सुरू होईल त्यामुळे छत्र्या बरोबर आहेत ना एवढंच बघितलं ,**

**फार डोक्याला शॉट लावून घेऊ नका , छान चहा घ्या नाहीतर थंड घ्या**


🤣🤣🤣

***Just Chill***



## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com





प्रेम कुणावर करावं . . .
प्रेम कुणावरही करावं
*स्वतःवर प्रेम तर नक्कीच करावं*

मग कोणताही दिवस , वार , तारीख , वेळ , ठिकाण असो
तुम्ही असाल तिथे वसते
रंगीबेरंगी *प्रेमाचे गावं*

असं काहीच मला सांगायचं नाही , लईच रंगीबेरंगी फोटो आला , मग काय पोस्टला , इतकंच

*वाढदिवसाला नवीन वर्षात पदार्पण करतांना कुंपणा पलीकडे काय सोडून द्यायचं हे समजलं की जीवनाचा प्रवास आनंदी होणारच*

असं मला काहीच सांगायचं नाही , एव्हढे उच्च तत्वज्ञान माझ्याच डोक्यावरून जाईल याची तुम्हालाही खात्री आहेच .

सहज फोटो काढला ,
मग काय पोस्टला ,
इतकंच . . .



काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



*फक्त आपणच स्वतःमधील आनंदाच फुलपाखरू सदोदित विहरत ठेऊ शकतो*

त्याला मनस्थिती , स्थळ , काळ , वेळ , तिथी , वार इतकंच काय कोणतीही सुट्टी अशी काहीच बंधने नसतात . . .

*बापरे , बापरे , बापरे*
हे असं मला काहीच म्हणायचं नाही

फुल *पाखरू* फोटो वाटला ,
लगेच पोस्टला , इतकंच . . .





उगाचच त्रागा करून *बांबू* घेऊन ह्याचा त्याच्या पाठीमागे लागण्यापेक्षा *बांबू* रुजवले तर बांबूचे बन नाही तरी छान हिरवीगार भिंत उभी राहू शकते

उन्हाचा तडाखा वाढत असतांना आपल्या आजूबाजूला हिरवाईच्या भिंती उभारल्या तर त्या मनाला गारवा देतात
*मग लावा बांबू*

सहज काढलेला फोटो आहे ,
फार मनाला लावून घेऊ नका 😝

हल्ली सिमेंटच्या जंगलात *बांबु* लावायला प्रत्येकाला जागा तरी आहे का? 😝😝

त्यापेक्षा
जरा थंड घ्या 😝

*Just Chill*

## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com

स्वतःचे हात जोडलेले असले की सगळी माणसं आपल्याशी आपोआपच जोडली जातात*

कायमच प्रत्येकाला वंदन करावे ही तर आपली संस्कृती

काही जण आपल्या आयुष्याला सुयोग्य आकार देतात पण सर्वात महत्वाचे अनेकांना अभ्यासल्यावर आपण काय करणे *अयोग्य* आहे याचे आकलन होते , त्यांच्या सारखे वागणे , विचार करणे जाणीवपूर्वक टाळले तरी आपले आयुष्य सुकर होते ,
तेच आपले खरे *गुरू*



*सर्वांनाच *वंदन* 🙏🏻

असं मला काहीच सांगायचं नाही कारण ही ज्याची त्याची आपापली विचारसरणी असते

आणि हो याचा गुरुपौर्णिमेशी काही संबंध नाही

डोक्याला फार शॉट लावून घेऊ नका , पूर्वी घराच्या गॅलरीतून डोकावणारे आता सारखे मोबाईलच्या फोटो गॅलरीत डोकावत असतात , तसंच काहीसं मलाही हा फोटो दिसला आणि लगेच तो पोस्टला इतकंच

छान पावसाळी वातावरण आहे तेंव्हा गरमागरम भजी आणि चहा घ्या ......

🤣🤣🤣

जरा थंड घ्या
म्हणजे हल्ली म्हणतात ना

*Just Chilllll*

## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com

वय वाढून *घोडे* झालात तरी आपल्यातील पूर्वज अर्थात *माकड* जागृत ठवले की मनानी तरुणच राहाल

*बापरे , बापरे, बापरे*
मला असं काहीच म्हणायचं नाही , उलट हा फोटो बघितल्यावर तुम्हालाच दोन घोडे बघितल्यासारखे भासेल



## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे




*सेल्फी*
आपलाच कॅमेरा ,
आपल्यांचाच फोटो

*पण*
आपला कॅमेरा असतांना दुसऱ्याच्या कॅमेऱ्यात फक्त आपलाच फोटो म्हणजे *सेल्फीश*

*बापरे , बापरे , बापरे*
मला असं काही म्हणायचं नाही ,

मोबाईल येण्याच्या आधीच्या काळातील कॅमेरामध्ये काढलेले फोटो सापडले , ते पोस्टले , इतकंच . . .

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



*कितीही गाजर अर्थात प्रलोभन दाखवलं तरी वृत्ती कासवाची असली तर वाटचाल कूर्मगतीनेच होते*

विद्यार्थ्यांना कितीही मोठ्ठं आमिष दाखवले तरी त्यांची प्रगती त्यांच्या त्यांच्या कुवतीनुसारच होणार हे वास्तव बहुतांश पालक आणि शिक्षक दुर्लक्षित करतात आणि स्वतःचा अपेक्षा भंग करून घेतात

माझे केस कितीही पांढरे झाले तरी माझ्या आनंदी वृत्तीमुळे माझ्यातील बालपणाची प्रौढत्त्वाकडे वाटचाल कासवाच्या गतीनेच होणार

*बापरे , बापरे , बापरे*
हे अगाध तत्वज्ञान माझ्याच डोक्यावरून गेले

दिवसेंदिवस उन्हाळा वाढतंच चालला म्हणून बारीक चंपी केली पण डांबरीकरण राहून गेलं

हा माझा अवतार
मित्राने छबीत टिपला ,
तो मी लगेच पोस्टला ,
इतकंच . . .



काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



Voice Vista
VENTURE BY POOJA PRASUN



काही जण जन्मतःच
दगडासारखे राकट असतात |

तर काही जण
प्रतिकूल परिस्थितीतीमुळे
दगडासारखे कणखर बनतात |

तर काही जण
भावनाशून्य असल्याने
दगड भासतात |

तर माझ्यासारखे
काही दगडच असतात |

*पण दगड मातीपासून सुरु होऊन सरणावर संपणाऱ्या आयुष्यात नात्यांचे विविध रंग भरत गेलात तर आपसूक चेहऱ्यावर तजेला येतोच*
आणि इतरांचं आयुष्यपण रंगीत होऊन जातं


*बापरे , बापरे , बापरे*
हे असलं तत्वज्ञान माझ्यासारख्या गोदावरीतील गोट्याला काय समजणार म्हणा

या फोटोत खाली दगड आणि वर लाकूड या निव्वळ योगायोग आहे

मित्राने छबी काढली
मी ती फक्त पोस्टली ,
इतकंच . . .

## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



आपला आनंद इतका *दीन* नसावा की त्यासाठी कोणता तरी *दिन* साजरा करण्याची गरज भासवी

विशिष्ट दिन असला की त्या दिवशी सगळ्यांचेच झोके उंच असतील , पण आनंदी राहिलात की रोजच म्हणाल . . .
*उंच माझा झोका*

असं काही माझं म्हणणं नाही ,
सहज छबी काढली , मग काय पोस्टली ,
इतकंच . . .

आनंदी माणसाचा असतो रोजच *रंगोत्सव*

स्वतःच्या जीवनात आनंदाचे रंग उधळायला *रंगपंचमीची* गरज नसते

असं काही मला तरी म्हणायचं नाही ,
मी नाचत असताना मित्राने छबी टिपली , ती मी पोस्टली , इतकंच . . .



## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 5 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



Voice Vista
VENTURE BY POOJA PRASUN



***I Love Me***
**खरंतर स्वतःवर *प्रेम* करण्याच्या नादात बहुतांश लोक अवास्तव अशी खोटी प्रतिष्ठा , विद्वत्ता , गुण , नीतिमत्ता , माणुसकी याची विपुलता आपल्यात ठासून भरलेली असल्याच्या गैर समजुती तुन एका भव्यदिव्य अशा बेगडी *फ्रेम* मध्ये स्वतःला बघतात आणि दुर्दैवाने तसेच समाजात वावरताना पण दिसतात**

***I Love Me***
**म्हणजे**
***आय माझ्यावर प्रेम करते***
**प्रत्येक लेकरात त्याच्या आई विषयीचे हे वैश्विक वास्तव आहेच**

***बापरे , बापरे , बापरे***
**असे काही मला म्हणायचं नाही** 🤪

**मित्राने फोटो फ्रेम बनविण्याचे ॲप सुचवले त्यात स्वतःच्याच फोटोवर प्रयोग करून बघितला , फारच गुलाबी वाटला म्हणून लगेच पोस्टला , इतकंच** 🤣

## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



*आत्मविश्वास* आणि *स्वानंद* या पंखांच्या जोरावर ध्येयपूर्तीसाठी सातत्याने निष्ठापूर्वक सचोटीने प्रयत्न केले तर यशोशिखराकडे *गरुड झेप* नक्कीच . . .

*बापरे , बापरे , बापरे*
हे असं मला काहीच म्हणायचं नाही ,
खोट्या गरुड पंखांबरोबर माझ्या अकलेची भरारी एव्हढी जाणार नाही याची तुम्हालाही खात्री असेलच

सहज फोटो काढला ,
लगेच पोस्टला ,
इतकंच

## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

*चांगल्या गोष्टी नुसतं बघून ,
वाचून , ऐकून साध्य होत नाहीत*

त्यासाठी प्रत्यक्ष कृती , अंगीकार , आचरण , प्रयत्न , सातत्य याची खंबीर जोड आपल्यालाच द्यावी लागते

जसं की
*सायकलमुळे आयुष्य फुलतं , खुलत . . .*
हो , पण त्यासाठी ती रोज चालवायला पाहिजे

*बापरे , बापरे , बापरे*
मला असं काहीच म्हणायचं नाही ,
सहज काढलेला फोटो छान वाटला,
मग काय पोस्टला ,
इतकंच . . .



Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



Voice Vista
VENTURE BY POOJA PRASUN



*ग्रहतारे वा दिशा यांच्याविषयीच्या अंधश्रद्धा , कमकुवतपणा , न्यूनगंड यासारख्या अनेक छत्र्यांच्या आडोश्याखाली दडून बसून आयुष्यभर नशिबाला दोष देत आपण आपले अपयश लपवण्याची केविलवाणी धडपड करत असतो*

अशा छत्र्या झुगारून उलट्या टांगून ठेवल्या की ध्येयपूर्तीकडे जाण्याचा आपला मार्ग रंगीबेरंगी होऊन जातो

नकळत आपण स्वतःच्याच प्रेमात पडतो आणि आयुष्य गुलाबी होऊन जाते

*बापरे , बापरे , बापरे*
असे उच्चकोटीचे विचार मला तरी सुचणं कठीण आहे 🤪

मित्राने माझी छबी काढून पाठवली,  फारच रंगीबेरंगी भासली म्हणून लगेच पोस्टली , इतकंच 🤣

## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



*लोकांना पाण्यात बघण्यापेक्षा आपण त्यांच्या आनंदांच्या रंगात पाण्यासारखं मिसळून गेलो तर आपल्या चेहऱ्यावर पण आनंद झळकतोच*

इतरांची प्रगती , मानसन्मान , यश अशा आनंदाच्या गोष्टी बहुतांश लोकांच्या मनात खदखद निर्माण करतात त्यामुळे अशा व्यक्तीचे चेहरे कायम त्रासिकच भासतात , तेच आपण त्या आनंदात अंतःकरणापासून सहभागी झालो की आपल्याला पण आनंद मिळतोच इतकी साधी गोष्ट , पण बहुतांश लोकांना ती फारच अवघड भासते

*बापरे , बापरे , बापरे*
असं मला काहीच म्हणायचं नाही , रणरणत्या उन्हात नितळ पाण्यात उभं राहिल्या बरोबर लगेच थंडावा जाणवला , ती प्रसन्नता मित्राने छबीत टिपली आणि मी ती छबी पोस्टली ,
इतकंच . . .

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



*मन सैरभैर असलं की सुखाचा मार्ग चिंतेच्या वर्तुळात हरवून धूसर होत जातो*
पण मन शांत असलं की जीवनाचा मार्ग पदोपदी सुशोभित भासायला लागतो

हे दोन्ही फोटो एकत्र बघतांना असं काही मला जाणवेल यावर तुमचाच काय माझाही विश्वास नाही

मित्राने घाईघाईने काढलेला फोटो वर्तुळाकृती ब्लर आल्याने परत शांततेत एक फोटो काढला तो स्थिर आला , दोन्ही फोटो एकदम बघण्यात आले ,
मग काय नेहमीप्रमाणे पोस्टले इतकंच

## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

*काऊ बॉय*
दोन शब्दांमध्ये स्वल्पविराम नसला की अर्थ बदलतो
व्याकरणाची चिन्हे विसरलात की मजुकरचा अर्थ बदलतो
*आयुष्याच सुद्धा व्याकरण असंच समजून घ्यावं लागतं*
चिन्हे विसरणे म्हणजे नाती बिघडण्याचे चिन्ह असते

असं मला अजिबातच म्हणायचे नाही , कारण तत्वज्ञान शब्द म्हणजे माझ्यासाठी कायमस्वरूपी *प्रश्नचिन्ह* असते

फक्त *काऊ बॉय* हे वाचून तुम्हाला मी लगेच *गुराखी* वाटलो असेल तर तसे काही नाही.

माझ्या अत्यंत आवडत्या निसर्गरम्य अशा *मोहरान* ला गेलो तेंव्हा सहज फोटो काढला , त्यात मराठी *गाय* आणि इंग्रजी *गाय* अर्थात निरागस *मुलगा* आहे एवढंच मला सांगायचं होत



Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com

***तुमच्यातील हिरवेपणा संपला की तुम्ही पायदळी तुडवले जाता . . .***

**सूर्य अर्थात ऊर्जा झाडावरील पानांना तजेलदार ठेवते पण एकदा का पानं सुकून गेली की झाड पण त्यांची साथ सोडते आणि ऊर्जा देणारा सुर्यच वाळक्या पानांना करपुन काढतो पुन्हा मातीत विलीन होईपर्यंत**

**आजकालच्या व्यवहारी जगात बेगडी नात्यांची गत सुद्धा झाडांच्या पानांप्रमाणेच होते**

**कोरड्या रंगात कितीही रंगपंचमी खेळलात तरी हिरव्यागार निसर्गाच्या विविध रंगांच्या छटाच कायमस्वरूपी मनात सुखाचा ओलावा जागरूक ठेवतात हे मात्र नक्कीच**

**अर्थातच असं काहीच मला अभिप्रेत नाही**

**रंगपंचमी खेळून झाडाखाली विसावलो होतो ती छबी मित्राने मोबाईल मध्ये टिपली आणि मला पाठवली**

**लईच हिरवं हिरवं वाटलं 🤣**
**म्हणूनच लगेच पोस्टलं 😜**



काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



सर्व प्रकारच्या नातेसंबंधात पस्परांच्या आंतरिक रंगाशी *मिळतजुळत* घेणं हे खरं *मॅचिंग*

आणि तसं झालं तर चेहऱ्यावर *गुलाबी* छटा आलीच समजा

पण बहुतांश लोक बाह्यरंगाच्या *मॅचिंगचा* सोस बाळगतात आणि गुलाबीला गुलाबी असा आटापिटा करतात , मात्र ते बघून सर्वांची मनं गुलाबी होण्याची शक्यता धुसरच

*बापरे बापरे बापरे* !!!
एवढे जड विचार माझ्या मनात येणे दुरापास्तच . . .

जॅकेटला *मॅचिंग* रंग असलेली कार रस्त्यात उभी दिसली , मग काय लगेच तिच्या जवळ उभं राहून फोटो काढला

लईच *गुलाबी* वाटला ,
मग काय लगेच
पोस्टला ना राव 🤣

## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



Voice Vista
VENTURE BY POOJA PRASUN



# काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

*दुसऱ्याच्या चेहऱ्यावर सुखाचे रंग भरले की आपल्या चेहऱ्यावर ते आपोआप येतातच*
सामान्यतः बहुतांश जण हे ठराविक दिवशीच करतात म्हणूनच दुसऱ्या दिवशी पासून असंख्य रंग उडालेले चेहेरे आपल्या अवतीभवती वावरतांना दिसतात


त्यामुळे दैनंदिन जीवनात रोज प्रत्यक्ष रंग जरी वापरले नाहीत तरी इतरांच्या आयुष्यात आपण समाधानाच्या रंगांची उधळण करत राहिलो तर सदैव स्वतःच्याही चेहऱ्यावर सुखसमृद्धीच्या रंगांची उधळण आपोआप होतेच

इतका गहन विचार मला तरी नक्कीच अभिप्रेत नाही ,

नाशिकला *रंगपंचमी* खेळतात , असेच जुने काही फोटो दिसले मग काय लगेच पोस्टले , इतकंच

वेडी लोकं काहीही सांगतात , म्हणे
*आपल्या आयुष्यात आपणच रंग भरायचे असतात*

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



# काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

*छोट्या छोट्या संकटांवर विजय मिळवला की मोठ्ठा आनंद मिळतो*

बहुतांश वेळा उंदरासारख्या अनेक छोट्या छोट्या गोष्टी प्रचंड प्रमाणात त्रासदायक ठरत असतात
अशा अनेक संकटांचे एकत्रीकरण झाले की त्याचे रौद्र रूप भासते आणि विवंचनेत कायम भर पडत जाते
अशावेळी छोट्या संकटांवर आरूढ होऊन त्यांना काबूत आणत गेलो की पहाडा एव्हढा आनंद प्राप्त होतो

आपण एकदम संपूर्ण पोळी न खाता त्याचे बारीक बारीक घास करून ती चटकन फस्त करतो इतकी साधी गोष्ट प्रत्येकवेळी आचरणात आणली की अशक्य काहीच नसतं



हे असं काही फोटोतुन सांगणं मला नक्कीच अभिप्रेत नव्हतं

लंबोदर विनायकाच्या मूषक वाहनाची आठवण झाल्यास तो निव्वळ योगायोग समजावा

माझे मित्र *शिरीष वाबळे* यांच्या भव्य अशा *इन्ट्रो फर्निचर* शोरूम मध्ये नेहमीप्रमाणे खरेदीला गेलो तिथे हा उंदीर बघितला ,
मग काय
*एक फोटो तो बनता है ना यार*

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com

*आयुष्य दरवर्षी पुढे सरकत , पण मनात आनंदाचा झुला झुलत असेल तर त्या हिंदोळ्यावर ते माघारी पण येत*

हा फोटो बघून असा काही उच्च कोटीचा विचार माझ्या मनाला काही शिवला नाही

सहज काढलेली छबी पोस्टली , एव्हढंच . .



## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे




*पतंग उंच उडवायचा असेल*
*तर त्याला ढील द्याव्या लागतो*
तरच त्याचा तो गगन भरारी घेतो , नुसता दोरा आपल्या हाती म्हणून कायम ओढून ठेऊन उपयोग नसतो

अर्थात याचप्रमाणे पालकांनी मुलांना भरारी घेण्यासाठी थोडी सूट दिली पाहिजे , कायम ताणून धरू नये असं काही अर्थ मला तरी अभिप्रेत नाही

खूप दिवसांनी स्वतःसाठी वेळ काढता आला , मग काय दिला ढील स्वतःच्या आनंदाला ...

उडी उडी जाय ,
*दिलकी पतंग मेरी*
*उडी उडी जाय* 🤣

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



***सुंदर ते ध्यान***
**बसे बाप्पा पाशी . . .**

**देव मानायचा का**
**नाही मानायचा**
**हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे**

**पण देव मानणारे बहुतांश लोक त्याच्या चरणी नतमस्तक होतात तेच मुळी स्वतःच्या सुप्त अपेक्षांची पूर्ती करण्यासाठी , विद्यार्थ्यांना गुण हवे असतात , तरुणांना प्रेम आणि संपत्ती , आईवडिलांना पाल्यांची प्रगती , रुग्णांना निरामय आरोग्य तर जेष्ठांना कुटुंबाच्या उत्कर्षा बरोबर स्वतःची कुटुंबाने काळजी घ्यावी याची खात्री . . .**
**ब्ला ब्ला ब्ला ........**

**थोडक्यात काय**
***अपेक्षापूर्तीसाठी आयुष्यभर प्रत्येक जण कुणाच्या तरी चरणाशी लीन असतो***

**असं काही मला नक्कीच म्हणायचं नाही .**

**गणपती बाप्पाची छानशी मूर्ती हिरवाईत विसावलेली दिसली आणि योगायोगाने मीही हिरवाई पांघरली होती म्हणून बाप्पाच्या सोबत फोटो काढला ,**
**पोपटराव दिसत होतो**
**म्हणून थोडी पोपटपंची**


**थोडक्यात काय**
***सुंदर ते ध्यान***
**बसे बाप्पा पाशी . . .**

**फोटो छान वाटला**
**मग लगेच पोस्टला**
🤪🤪🤪🤪🤪



काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com





ऋषितुल्य व्यक्तीच्या नुसतं पायाशी बसून , त्यांच्यापुढे नतमस्तक होऊन आपल्यात बदल होत नाही ही जाणीव बहुतांश लोकांना नसते ,
परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी स्वतः जीवतोडुन अभ्यास आणि त्याच्या जोडीला आशीर्वाद हेच कामी येतं

तसंच मूर्ति पूढे नतमस्तक होण्यासोबतच त्या महापुरुषांच्या विचारांचा अंगीकार करणं हेच महत्त्वाचे

नाहीतर असा फोटो म्हणजे फक्त
*एक बुद्ध - एक निर्बुद्ध*

अर्थात मला फक्त
किती छान , भावसंपन्न , छोटीशी बुद्धाची मूर्ती आहे हेच तुम्हाला दाखवण्यासाठीच हा फोटो प्रपंच ,
इतकंच 🤣🙏🤣

## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

*लहान मोठ्या टवटवीत फुलांचा मोहक ताटवा*

समाजाला *फुल* करत बसण्यापेक्षा , स्वतः *टवटवीत फुल* झालात की आयुष्यभर तुमच्या भोवताली आनंदाचे , सुखाचे , समाधानाचे सदाबहार ताटवे निश्चितच फुलत राहतील

*लहान मुले ही देवघरची फुले*
याचा शब्दशः अर्थ नसतो लावायचा ,
खरं तर लहान मुलं निरागस , निष्पाप असतात , तीच वृत्ती देवाला आवडते
त्यामुळे अशी वृत्ती कायम ठेवली आणि वय कितीही वाढलं तरी तीही मुलं देवाला आवडणारच !!!

असं काही मला सुचण्याची सुताराम शक्यता नाही तसेच दसऱ्याशी पण या फोटोचा काहीही संबंध नाही

काल प्रवासात छान झेंडूच्या फुलांची बाग दिसली मग काय काढला फोटो आणि पोस्टला



Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com

Voice Vista
VENTURE BY POOJA PRASUN



**सध्या कोणताही सणवार असो लोक सोशल मीडियाच्या माध्यमातून शुभेच्छांच्या *टोपल्याच्या टोपल्या* आपल्या सुपरिचित , परिचित , अपरिचित अश्या सर्वांवर बदाबदा उपड्या करतात पण या शुभेच्छा आभासी असल्याने समोरच्याला खरंच आनंद मिळतो का ?**

***प्रत्येकानी स्वतःतील मोर स्वतःच फुलवून नाचरा ठेवला तरच त्याच जग आयुष्यभर आनंदी होतं***

**असं काही या फोटोत शोधत बसू नका**

**मी मोरपंखी टीशर्ट घातला होता म्हणून मोरपिसांच्या सोबत फोटो काढला इतकंच**

***आप्तेष्टांनाच काय पण स्वतःच स्वतःला सुद्धा भेटून साजरा होणारा प्रत्येक दिवस दिवाळी असतो***

**त्यामुळे याचा कोणत्याही दिनविशेष शुभेच्छांशी सुद्धा काहीच संबंध नाही**

## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com

*झेंडूची फुले*
हे विडंबन नाही
🤣🤣🤣

*ट्युलिप गार्डन* साठी झुरत बसण्यापेक्षा आपला आपला *झेंडूचा ताटवाच* आपल्याला कायमच टवटवीत ठेऊ शकतो
🤣🤣🤣

थोडक्यात काय
*प्रेम कोणावर करावं ?*
*तर स्वतःवर नक्कीच करावं*
🙈🙈🙈



आंतरिक चैतन्याची बरसात असेल , तर आयुष्य सदैव टवटवीत *फुल*

नाहीतर लोक रोजच करतात की तुम्हाला *एप्रिल फुल*



काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com

*हातात मोबाईल ऐवजी लेझीम , एखादे वाद्य म्हणजे अगदी चिपळया , टाळ असे असले की खरंच तनामनाने आपण तल्लीन होऊन जातो*

साधू , संत ध्यान लावून स्वतःशी एकरूप होऊ शकतात पण कष्टकरी मात्र वारीत सहभागी झाले की तल्लीन होऊन जातात

असं काही मला सांगायचं नाही ,
तसं याचा आषाढीच्या वारीशी पण काहीच संबंध नाही ,

ग्रंथ तुमच्या दारीच्या निमित्ताने आयोजित एका ग्रंथदिंडीत उगाच लेझीम घेऊन काढलेला फोटो सापडला लगेच पोस्टला सगळीकडे इतकंच

फार डोक्याला शॉट लाऊन घेऊ नका ,
*उपासाच्या नावाखाली भरपूर खा*
गरमागरम चहा किंवा थंड घ्या .

🤣🤣🤣

*Just Chill*



## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com





*आधी आपल्या मनाचा आवाज आपल्याला स्पस्ट ऐकू आला , उमजला की आपला आवाज ऐकणाऱ्याच्या मनाला आपोआप भिडतोच*

नाही तर *माईक* घेऊन सुद्धा फक्त *ध्वनी* त्यांच्यापर्यंत पोहचेल , *भावना* पोहचतीलच याची मात्र काहीच शास्वती नाही
🙏


हे मला तरी *उमजलं* का ?
ते अजून मलाच *समजलं* नाही
त्यामुळे तुम्ही पण डोक्याला फार शॉट लावून घेऊ नका ,

पूर्वी घराच्या गॅलरीतून डोकावणारे आता सारखे मोबाईलच्या फोटो गॅलरीत डोकावत असतात , तसंच काहीसं मलाही हा फोटो दिसला आणि लगेच तो पोस्टला इतकंच

छान पावसाळी वातावरण आहे तेंव्हा गरमागरम भजी आणि चहा घ्या
🤣🤣🤣
जरा थंड घ्या
म्हणजे हल्ली म्हणतात ना
*Just Chilllll*

काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com





*सरड्या सारखे रंग बदलणे*
म्हणजे खरं तर निसर्गाशी एकरूप होणे

सरडा स्वतःचा जीव वाचविण्यासाठी बदलत्या निसर्गाचा रंग धारण करून त्यात एकरूप होतो पण *माणूस स्वार्थासाठी आपले रंग बदलतो* आणि एव्हढं करून दुसऱ्यांना नावं ठेवतो की काय सरड्या सारखे रंग बदलतो

| दृष्टी बदला |
|| निसर्ग वाचा ||
||| निसर्ग वाचवा |||
🙏🙏🙏


हे फोटो बघून मला असं काही
सुचणार नाही याची तुम्हालाही खात्री असेलच ,
🤣🤣🤣

नवीन तंत्रज्ञान वापरून असे विविधरंगी फोटो सहज करता येतात , तसाच एक फोटो गवसला तो पोस्टला इतकंच , फार डोक्याला शॉट लावून घेऊ नका

चिल मारा म्हणजेच
*Just Chilll*

काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com






माझा प्रत्येक दिवस मीच गोड करतो त्यामुळे साजरा करण्यासाठी कोणत्याही *डे* ची वाट पहावी लागत नाही . . .
म्हणूनच प्रत्येक दिवसाला *गोडवा* येतोच . . .

*थोडक्यात काय* तर . . .
एव्हरी डे इज फ्रेंडशिप डे

*कारण*

एव्हरी *डे* इज *रानडे*

*आपल्यातील अवखळ बालपण जपलं की आयुष्यभर उत्साह आणि आनंद ओसंडून वाहत राहतो.*

असं नुसतं वाचून ऐकून काही होत नसतं , फार मनाला लावून घेऊ नका 😂

जेष्ठ अभिनेते *प्रदीप वेलणकर* यांच्या बरोबर झालेल्या प्रत्येक भेटीत दिलखुलास गप्पा होतात


सहजच फोटोसाठी त्यांच्या बाजूला बसलो आणि काढली न बंदूक त्यांनी , मग जरा माझी पण नौटंकी 😝😝😝

इतकंच . . .



## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



Voice Vista
VENTURE BY POOJA PRASUN



***काय दिवे लावले !***
**हे खरे तर गौरवोद्गार असायला हवेत कारण जसे अंधःकार दूर करण्याचे महत्त्वाचे काम दिवे करतात, त्याप्रमाणेच समाजातील छोट्या मोठ्या समस्यांचे निराकरण करून दुःखी कष्टी समाजाच्या जीवनातील अंधःकार दूर सारून त्यांचे जीवन उजळून टाकण्यासाठी अनेक *निस्वार्थी समाजसेवक* अहोरात्र झटत असतात , म्हणजेच ते पीडितांच्या आयुष्यात मदतीचा , सहानुभूतीचा दिवा लावून त्यांचे जीवन प्रकाशमान करतात**

***सर्व दिव्यांना रोजच वंदन***
🙏🙏🙏

**याचा दीप अमावस्येशी काही संबंध नाही , तसेच जुन्या पिढीला कायमच नवी पिढी काय दिवे लावणार ही समस्या भेडसावत असल्याचे दिसते , अर्थात कोणत्याही पिढीचा मी प्रतिनिधी असलो तरी मी काय दिवे लावणार म्हणा**

**तेव्हा डोक्याला शॉट लावून घेऊ नका , गॅलरीत फोटो सापडला तो पोस्टला इतकंच , छान पावसाळा सुरु आहे त्यामुळे गरमागरम भजी खा आणि चिल मारा .**

🤣🤣🤣
***Just Chillll***

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com

*झोपाळयावरचा देखावा*
बहुतांश वेळेला आपण वेळ निघून गेल्यावर अनेक गोष्टी करतो ,
जसे आप्तेष्ट हयात असतांना त्यांना भेटायला जाण्यासाठी आपल्याला सवड नसते आणि मग शेवटच्या क्षणी त्यांच्या घरी किंवा दवाखान्यात जाऊन याबाबत आपण खंत व्यक्त करत बसतो.
हयात असतांना त्यांच्या हस्ते दानधर्म करणे , त्यांच्या आवडीनिवडी जपणे असे न करता ते गेल्यावर दानधर्म , एखादी गोष्ट व्यर्ज करणे यातच बेगडी समाधान मानतो.

असं ह्या फोटो मधून मला काहीच सांगायचं नाहीये तसेच लवकरच येणाऱ्या पितृपक्षाचा सुद्धा काहीच संबंध नाही
🤣🤣🤣🤣

*खरं सांगायचं असं -*
की आमच्या बाप्पाच्या घरगुती विसर्जना नंतर *शाडू मातीची पोटली* त्यातील पाणी निथळून जाण्यासाठी पावसापासूनच्या रक्षणासाठी झोपाळयात टांगून खाली किती पाणी निचरा झालं हे बघण्यासाठी टब ठेवला आहे.
*ही माती मूर्तिकाराकडे सुपूर्द करून पुढच्या वर्षी परत बाप्पाच्या रुपात विराजमान होईल याच समाधान आहे*
खऱ्या अर्थाने . . .

*पुनरागमनायाच*
🙏🙏🙏

काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे



Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



रंगीबेरंगी कपडे विकत घेता येतात पण मनातला आनंदच चेहऱ्यावर रंग आणू शकतो

थोडक्यात काय
*प्रेम कोणावर करावं ?*
*तर स्वतःवर नक्कीच करावं*
🙈🙈🙈




*शिट्टी स्वतःसाठी वाजवली की ...*
मग रोजच प्रेमाचा दिवस
🙈🙈🙈

प्रेम कुणावर करावं . . .
सर्वात आधी स्वतःवर करावं 🤣

## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



हिरव्यागार कुरणासारख्या संपन्न सामाजिक संस्था या आपल्याच हातात असायला पाहिजे म्हणून काही पदाधिकारी दटून उभे राहण्याची आयुष्यभर केविलवाणी धडपड करत असतात ,
पण ते बुजगावण्यासारखे असतात

यांच्यामुळे ना संस्था बहरतात , ना समृद्ध होतात , इतकेच काय संस्थेला जर कधी आर्थिक , सामाजिक झळा बसत असतील तर त्याची झळ स्वतःला बसू नये म्हणून गॉगल , टोपी सदृश मार्गांचा ते बरोबर अवलंब करतात .

रुक्ष , लयास जात असलेल्या कमकुवत संस्थांमध्ये ते फिरकत पण नाहीत कारण . . .
*ओसाड शेतात बुजगावणी नसतात*

बापरे , बापरे , बापरे
मला असं काही म्हणायचे नाही


मित्राने छबी काढली ,
लईच हिरवीगार वाटली ,
मग काय लगेच पोस्टली ,
इतकंच . . .

🤪🤪🤪



## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



Voice Vista
VENTURE BY POOJA PRASUN




आजकाल बहुतांश लहान लहान विद्यार्थी पाठीवर पुस्तकांचा भार वाहून नेताना दिसतात ,
*पण नुसत्या पुस्तकांच्या पेट्या वाहून नेऊन ज्ञान मिळत नाही*
तर त्यासाठी पुस्तकांमधील ज्ञानसागरात वाहतं राहील पाहिजे

*बापरे , बापरे , बापरे*
मला असं काहीच म्हणायचं नाही , *ग्रंथ तुमच्या दारी* योजनेतील पेटी सोबतचा फोटो सापडला , तो पोस्टला , इतकंच



## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

*शांत बसलेले माकड*
अश्या अनेक क्षणिक गोष्टी शिल्पबद्ध , चित्रबद्ध तसेच कॅमेरात टिपता येतात आणि क्षणिक असलेल्या या आनंदाला , सौन्दर्याला , सुखाला , अभिमानाला चिरंतन जपता येत .

हेच तत्व वापरून मनात काय साठवून ठेवायचं त्याचा निर्धार केला की मनात दुःखाला स्थानच उरणार नाही .

*शांत बसलेले माकड*
या शिर्षकाचा माझ्यामते तरी फोटोशी काहीच संबंध नाही कारण फोटोतील शिल्प *गोरिला* चे आहे

पण कोणाला दिसलेच
फोटोत *माकड* तर
*माकडा माकडा हुप*

😜😜😜

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



***बालपण देगा देवा . . .***
**असं नुसतं मागून मिळत नसतं  बालपण . . .**



***बालपण देगा देवा . . .***
**असं नुसतं मागून मिळत नसतं  बालपण . . .**



**प्रत्येक क्षण असा जगावा . . .**
**की वाटावं**
***एक शिट्टी तर झालीच पाहिजे***

**7 फेब्रुवारी म्हणजेच**
**लौकिकार्थाने माझा वाढदिवस पण याचा शिट्टी वाजवण्याशी काहीच संबंध नाही**

***जिवंत आहोत म्हणून वाढदिवस साजरा करण्यापेक्षा . . .***
**आयुष्यातील प्रत्येक क्षण जगा म्हणजे क्षण अन क्षण जणू वाढदिवसच**

**तो बजाओ सीटी  . . .**

## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com




प्रबळ इच्छाशक्तीच्या
कॅमेऱ्याने टिपत गेलात तर
दूरवर वाटणारी *सुखं*
एकदम नजरेच्या टप्प्यात येतातच . . .

*बापरे , बापरे , बापरे*
असं काही मला तरी अभिप्रेत नाही ,
मित्राने अशी अनोखी छबी टिपली ,
मी लगेच पोस्टली , इतकंच . . .



आपण कधीच करत नाही
असं  सर्वांना वाटतं

त्यामुळे समोरचा करतो
ते म्हणजे . . .
*नस्ती उठाठेव*
असं सर्वांना वाटत


जाऊ द्या ,
मलाही समजलं नाही
त्यामुळे मी काय सांगणार म्हणा

छबी सापडली ,
लगेच पोस्टली ,
इतकंच

😝😝😝

काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com





**आपल्याच आनंदाचा अथांग  डोह !**
**मग काय रोजच होतो डुंबायचा मोह !!**



**मनातले आनंदाचे *तरंग* ,**
**सुखाच्या जल्लोषाचा *संग* ,**
**तृप्तीच्या नृत्याचे *अंग* ,**
**मानवतेच्या सेवेचा *चंग***
**सोबतीला दिलखेचक *रंग* . . .**


**असं असलं की रोजच**
**रंग *पंचमी* . . .**



**रविवार असे आठवड्याचा पोळा !**
**गाडीकडे *बैलाचा* कानाडोळा !!**

## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



*आपलीच बुद्धी* ,
*आपलंच बळ*
सोंगट्या काळ्या असो वा पांढऱ्या , आपल्याच पदरी यशाचे फळ

बहुतांश जण संसाराच्या सारीपाटावर दोन्ही बाजूचे निर्णय स्वतःच घेऊन स्वतःलाच विजयी घोषित करतात आणि नेहमीच आपली प्रत्येक *चाल* किती महत्वाची आणि विचारपूर्वक असते या भ्रमात असतात

पण समाजात मात्र
*ज्याचं बळ , त्यालाच बुद्धी*
अशी विदारक परिस्थिती नाईलाजाने मान्य करत असतात

असं काही सुचण्या एवढी बुद्धी माझ्याकडे नसली तरी एकट्यानेच बुद्धिबळाचा डाव मांडून फोटो काढून मलाही बुद्धिबळ येते हे भासवण्याइतकी तरी किमान बुद्धी मला नक्कीच असावी या मताशी आपण नक्कीच सहमत असाल
🤣🤣🤣



## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



*आनंदी जीवनासाठी*
बालपणीचा अल्लडपणा , खोडसाळपणा कायम सोबतीला असावाच ..
नसावीत ती *कृष्णकृत्य*

अर्थात *कृष्णलीला* मात्र . ..
🤣🤣🤣

प्रत्येकाने जपावा
आपल्यातील *कृष्ण*

*बैलांचा*
*वर्षात एकदाच पोळा . . .*
याचा माझ्या वाढदिवसाशी
काहीही संबंध नाही


आपलं वर्षभर
*झगामगा आणि मला बघा*

🤣🤣🤣



## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



Voice Vista
VENTURE BY POOJA PRASUN



स्वतःची क्षमता
ओळखून असाल तर . .

कोणीही तुम्हाला
*हरभऱ्याच्या झाडावर*
चढवू शकत नाहीत

*बापरे , बापरे , बापरे*
असं काही मला अभिप्रेत नाही ,
मित्राने छबी टिपली ,
मी ती पोस्टली ,
इतकंच . .

## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

रणरणत्या उन्हात
सुखावे *बहावा* !
आपल्यातला तजेला मात्र
सर्व ऋतूत उजळत रहावा !!

कधीच होऊ देऊ नका
*गुल* आपल्यातील *मोहर* !
.... .... माझीच *लाल* ,
असा कोणी करेनात का कहर !!

🤣🤣😝🤣🤣



Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com

*ती* म्हणाली *गेला उडत*
मी तेही आनंदाने स्वीकारले ,
त्यातही रंग भरले ,
*आनंदी जगणे आपल्याच हातात असते*



उगाच तर्क लावत बसू नये , याचा *वटपौर्णिमेशी*
काहीही संबंध नाही

😝😝😝

*ती*
ही प्रत्येकाची वेगवेगळी असते

*गेला उडत . . .*
असा खूप प्रयत्न करून सुद्धा प्रतिसाद येतो ,
जसे की कोणाला . . .
उंची ,
प्रगती ,
प्रसिद्धी ,
सन्मान ,
यश ,
संपत्ती ,
ब्ला ब्ला ब्ला

इत्यादी आघाड्यांवर अपयशाची टोचणी अनुभवी लागते , तेंव्हा खरं तर आपणच म्हणायला हवं

*गेली उडत . . .*


या फोटोत खरंच एव्हढं तत्वज्ञान अजिबात अपेक्षित नव्हतं ,
उन्हाने त्रस्त झाल्यावर सुखद गारवा देणारे नाशिकच्या आजूबाजूला अनेक हिरवाईने नटलेले रिसॉर्ट आहेत ,
*प्रमोद कुटे* या माझ्या मित्राच्या *Stone Water Resort* मध्ये बागडत असतांना सहजच काढलेला हा फोटो

*बाकी काही नाही . . .*

जरा थंड घ्या
😝😝😝
*Just Chill*

## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



Voice Vista
VENTURE BY POOJA PRASUN



अवतीभवती दिव्यांच्या माळा असतील
तर कोणीही चमकू लागतो . . .

फक्त
*काय दिवे लावले*
अस कोणी म्हणणार नाही
याची जाणीव मात्र ठेवली पाहिजे ,

अस काही नाही ,
माझी आपली नेहमीप्रमाणे
*चमकोगिरी* . . .
इतकंच .
😝😝😝😝

*फोटो काढतो, हातामध्ये*
*धरुनी लाकडी विमान . .।*

*आयुष्य रंगारंग माझे . .*
*नित्य मौजेची चढती कमान . .।।*

दुकानदाराला स्वतःच्या पोटासाठी ग्राहकाच्या पोटाकडे बघून हे खेळणं विकण्याची *idea* येत असेल का ?
😝

*लवकरच पाचवा महिना लागेल* म्हणजेच येत्या *मे* महिन्यातील रखरखत्या उन्हाळ्यात *थंडावा* आणण्यासाठी कोणाला अशी *टोपी* घालण्याची *idea* काही उपयोगाची नाही हे मात्र निश्चित
😝😝



## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



मला कोणीही
एका जागेवर
*बांधू शकत नाही . .*

याचा
*वटपौर्णिमेशी*
काहीही संबंध नाही
😝😝😝

याचा साधा अर्थ म्हणजे
मी दुःख , वेदना अशा गोष्टी
झिडकारून कायम आनंदात विहरत
राहणार हे नक्कीच
🤣🤣🤣

## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

*काय ते डोंगार . . .*

*काय ते धुकं . . .*

*ओके हाय सगळं*

असं शब्दात सांगायची गरजच भासत नाही इतका बोलका निसर्ग नाशिकच्या चहुबाजूंनी आहेच

डोळ्यांप्रमाणेच मनाची कवाड उघडी ठेऊन जीवनाचा प्रवास करत राहिलात की
*आनंदाचा श्रावण असा जागोजागी अनुभवता येतो . . .*



Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



*सोनेरी पावलं तुमच्या दारी*
आज शुभारंभ स्वतःच्या घरापासूनच . . .
😝

आणि हो ,

*चमकते ते सगळंच सोनं नसतं*
आता हेच बघा ना ,
हल्ली पादत्राणे सुद्धा चमकतात
😝😝

याचा *दसऱ्याशी* तसेच
*दुसऱ्याशी* काही संबंध नाही
😝😝😝

## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे




*मोहनदास* 🙏 - ग्रंथदास



मस्त चॉकलेट्स , आईस्क्रीम
छान घसरगुंडी , झोके
म्हणजेच
*Every day is Ranade*

आपला रोजच असतो . . .
*बालदिन*

Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



असं हिरवळीवर पडून ऊन खायला फक्त *रविवार* असायला लागतो ही अंधश्रद्धा आहे
😃😃😃

*आपल्या नशिबात बंगल्याभोवती हिरवळ असणाऱ्या मित्रांचे बन असावे लागते*
😝😝😝



*असेल स्नेहाचा दोरा , जिव्हाळ्याचा वारा तरच पंतगाचा तोरा*

म्हणजे काय ?
स्नेहाच्या , सहकार्याच्या , मैत्रीच्या , नात्यांच्या , जिव्हाळाच्या दोरीची साथ नसेल तर *पतंग* सुध्दा गगनात विहार करू शकत नाही

*बापरे , बापरे , बापरे*
एवढ्या उच्च विचारांच्या पर्यंत मी काही उडू शकत नाही

रंगीबेरंगी छबी सापडली ,
ती पोस्टली ,
इतकंच

## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



*वाचणारा* विनायक ! 📚📖
*वाचवणारा पण* विनायक !!🌺



# काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

अडथळ्यांचे , संकटाचे चाक मोठे भासले की आयुष्याची सायकल चालवणे अवघडच .

*कामातील चिकाटी वाढवली की दोन्ही चाक सारखी होतात , मग सातत्याने पायडल मारण्याचा प्रयत्न वाढवत नेला की उत्कर्षाची सायकल जोरात पळते*

असं प्रत्येक फोटोत काही *ज्ञान* असलंच पाहिजे असं काहीच नाही 😝

उन्हाळा खूपच आहे ,
त्यामुळे जरा *थंड घ्या*

ते म्हणतात ना ,
*Just Chill*

😃😃😃

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com

Voice Vista
VENTURE BY POOJA PRASUN

*साम्य शोधत बसू नका*
🤣🤣🤣🤣



आपल्याला उगाचच
*हा , त्याच्या सारखा*
किंवा *तो ह्याचा सारखा* असं शोधण्यातच रमायला आवडतं

मग सुरू होतं ते स्वप्नरंजन . .
*अगदी*
त्यांच्या किंवा तिच्या सारखे
● गायन
● वादन
● अभिनय
● दिसणे
● खेळणं
*ब्ला ब्ला ब्ला*
म्हणजे त्यांच्या गाडीतून प्रवास करून सुद्धा आपण त्यांच्या सारखे नव्हे तर आपण स्वतःच सारखे असतो हे आपण मान्यच करत नाही

आता हेच पहा ना त्यांची
*महाराष्ट्राची हास्य जत्रा*
जगभर पोहचली

तर आपल्या
*ग्रंथ तुमच्या दारी*
योजनेतून जगभरातील वाचकांचं कुटुंब अविरत विस्तारत आहे

*ताडमाड नाही वाढलं तरी आपल्या फुलांचा सुगंध हेच अनंताचे बलस्थान*

*अनंत* हे गणपती बाप्पाचे फुल , त्याचा *विनायक* बरोबर उगाचच संबंध लावू नका

🤣🤣🤣🤣

थोडक्यात काय
*आपलं बलस्थान आपणच*

काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com

*एक चाक छोटं !*
*एक चाक मोठं !!*

अशी आयुष्यात प्रत्येक बाबतीत तुलना करत झुरण्यात काहीच अर्थ नाही.

*दृष्टी* ऐवजी *दृष्टीकोन* महत्वाचा . . .

आता या फोटोतून मला एव्हढंच सांगायचं की

*सायकल चालवणे*
*आरोग्यासाठी उत्तम*
😃😃😃
उन्हाच्या झळा वाढतायत ,
त्यामुळे *जरा थंड घ्या*

म्हणजे
*Just Chill*
😃😃😃



## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे



*बाई वाड्यावर या*


खरं तर मराठी चित्रपट सृष्टीतील एका नामवंत दिग्गज नटाने आपल्या कसदार अभिनयाने , दमदार संवाद फेकीने या वाक्याला एक वेगळीच ओळख प्राप्त करून मराठी माणसाच्या मनात खोलवर ठसवली आहे

पण अशी वाक्य बदनामीच्या , सूडाच्या भावनेने दुसऱ्या व्यक्तीच्या वर्तुणुकीला अकारण जोडणारे अनेक स्वयंघोषित थोर पुरुष आहेत.

संधी न मिळाल्याने नाईलाजाने साधू झालेली बहुतांश पुरुष मंडळी दुसऱ्याच्या वर्तणुकीत नसलेली खोट त्याला बळजबरीने चिकटवून आपण किती धुतल्या तांदळासारखे आहोत या बेगडी अविर्भावात समाजात वावरतांना दिसतात .

*बापरे , बापरे , बापरे*
मला असं काहीच म्हणायचं नव्हतं , लग्न समारंभ आटोपून फेटा न काढता मित्राच्या फार्महाऊस वर गेलो , तिथे छान झोपाळा होता , मग काय काढली छबी आणि पोस्टली , इतकंच ...

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



Voice Vista
VENTURE BY POOJA PRASUN

प्रत्येक ऋतूत
भरवता येतो *आनंदाचा मेळा* !
तीव्र उन्हाच्या झळा
शांत करी *बर्फाचा गोळा* !!

तसं या पृथ्वीवर आपण अवतरतो तेंव्हा असतो फक्त एक *गोळा* .
नात्यांचे , जिव्हाळयाचे , प्रेमाचे , मधुर रंग आपण नकळत गोळा करत जातो आणि बिकट परिस्थितीच्या झळा बसायला लागल्या की हाच गोडवा आपल्याला सुखावत जातो

मात्र असे स्नेहाचे अवीट रंग आपण सतत गोळा केले नाही तर उरतो तो शुष्क *गोळा* . . .

एवढ्या प्रचंड उकाड्यात असं तत्वज्ञान गोळा करण्यापेक्षा *रंगीबेरंगी बर्फाचा गोळा* हाणा

🤣


उष्मेचे भीषण तांडव
सुरू आहे त्यामुळे
*जरा थंड घ्या*

म्हणजे
*Just Chill*
🤣🤣🤣



## काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

Volume 4 | Voice Vista | May 2024
Ideation & Conceptualisation of Magazine : Pooja Prasun
Original Content | Edited by: Vinayak Ranade
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den
To Read More Visit: www.thevoicevista.com



*हत्तीच्या*
बाजूला हत्ती आहे तर 🤣

तुम्हाला आनंद मिळावा म्हणूनच *हत्तीच्या* नंतर उद्गारवाचक , स्वल्पविराम अशी चिंन्हे टाळली
🤣🤣🤣

योग्य ठिकाणी अल्पविराम , स्वल्पविराम , पूर्णविराम घेतला नाही तर अनर्थ होतो



आयुष्याचेही
चुकता *व्याकरण ...*

नात्यांचे फसते *सारण* !
गैरसमजांना वाव *अकारण* !
समाधानाचे निरस *वरण* !
तृप्तीचे नुसते बेचव *पुरण* !
व्याधीची साथ *विनाकारण* !
द्वेषाचा भुंगा *अकारण* !


थोडक्यात जीवनाचे होते *रण* !!


तो बोलो . . .
|| *गज* आनंद की जय ||

🤣🤣🤣🤣🤣

काही मुद्दे... काही विनायकी गुद्दे

# Recent Publications










Voice Vista
VENTURE BY POOJA PRASUN

To be a part of the upcoming Voice Vista magazine, feel free to contact us at www.thevoicevista.com

# Vinayaki Gudde

Where Sarcasm Finds Its Voice



Voice Vista

VENTURE BY POOJA PRASUN